
१३

# बाहुबली

आर. एस. सुरेन्द्र



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : क्रा. पा.
दा. क्र. : १३२०

BVBK-0401320

वाच. ग्रा. ग्रा.
१३२०
६।९।८२

पुष्प १३

# बाहुबली

लेखक
आर. एस्. सुरेंद्र

अनुवादक
रामनारायण

BVBK-0401320

भारत-भारती [मराठी संस्करण]
रुईकर पथ, नागपूर–२

प्रकाशक
भारत-भारती [मराठी संस्करण] बाल पुस्तकमाला

प्रभाकर फंजपुरकर
मंत्री
श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती
रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

सम्पादक, मराठी संस्करण
सुरेश दत्तात्रेय देशपांडे

प्रथम संस्करण मार्च १९८१

मूल्य रु. २–००

मुद्रक
दि. भि. धाक्रस
नाग मुद्रणालय, रुईकर पथ, नागपूर–२

१३२० दि. ५।९।८२

# थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्रोत. त्यांच्या जीवनाच्या अभ्यासातून आपल्याला नेहमीच वोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे'ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोटच्या-छोटच्या पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती'ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

आपला हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपल्यालाही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमाला लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत
**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**
सम्पादक

## बाहुबली

सत्तेच्या व संपत्तीच्या अहंकाराने फुगलेल्या आपल्या वडील भावाचा बाहुबलीने पराजय केला. पण त्याच क्षणी त्याला जीवनाचे खरे ध्येय गवसले. आपल्या पराभूत भावाचे राज्य त्याने परत केले आणि सर्वस्वाचा त्याग करून तो ईश्वरप्राप्तीसाठी अरण्यात निघून गेला. त्याने परमज्ञान प्राप्त करून घेतले. ह्या ज्ञानाच्या प्रकाशात त्याने आपले व आपल्या सर्व सहकाऱ्यांचे जीवन उजळून टाकले. कर्नाटक प्रांतातील श्रवणबेळगोळ येथे उभी असलेली श्रीगोम्मटेश्वराची भव्य शिल्पमूर्ती ह्या बाहुबलीचीच मूर्ती होय.

⊙ ⊙

9320 दि ६।१।८२

# बाहुबली

कर्नाटक प्रांतात हासन नावाचा एक जिल्हा असून त्यात श्रवणबेळगोळ अथवा श्रवणबेळगोळा हे जैन धर्मियांचे प्रसिद्ध तीर्थस्थान आहे. तेथे एका उंच टेकडीच्या शिखरावर एक अत्यंत भव्य व उंच शिल्पमूर्ती आहे. तीच बाहुबलीची किंवा गोम्मटेश्वराची सुप्रसिद्ध मूर्ती. त्या टेकडी भोवतालचा परिसर निसर्गरम्य आहे. मूर्तीच्या मस्तकावर पसरलेले विस्तीर्ण आकाश पाहून हे आकाश त्या मूर्तीसाठीच सुयोग्य पार्श्वभूमी असावी, असे कुणालाही वाटते. शिल्पमूर्तीची मुद्रा अतिशय शांत व गंभीर आहे. आकाशाप्रमाणेच ती भव्य आणि अद्वितीय आहे.

सत्तावन फूट उंच असलेली ही मूर्ती एकाच दगडातून कोरलेली आहे. इतकी उंच व भव्य मूर्ती इजिप्त सोडून अन्यत्र कुठेही नाही. इ. स. ९८१ साली गंगराज राचमल्ल ह्या राजाच्या

चावुंडराय नावाच्या प्रधानाने ही मूर्ती तयार करविली.

जैनांच्या पुराणात बाहुबलीला फार महत्त्व आहे. भारतीय संस्कृतीच्या आंतरिक अथवा आत्मिक सामर्थ्याचे प्रतीक म्हणजे बाहुबलीचे जीवनचरित्र. वस्तुत: बाहुबलीने आपल्या भावाचा पराजय केल्यानंतर तो एक वैभवसंपन्न सम्राट बनू शकला असता. पण त्या सम्राटपदाचा त्याग करून जिंकलेले राज्य पराभूत भावाला त्याने दान केले. केवढा हा त्याग ! त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण. असा हा बाहुबली म्हणजे स्वार्थ, मत्सर, क्रोध आणि अहंकार ह्यावर विजय मिळविणारी एक महान भारतीय विभूती !

**वृषभनाथ**

जैन धर्मात एकूण २४ तीर्थंकर होऊन गेले. ते सर्व अवतारी पुरुष असून महान त्यागी व तपस्वी होते. कोणते तरी उच्च ध्येय हृदयात बाळगून ते मानवी रूपात जन्माला आले. ज्या ज्या वेळी ह्या जगात अधर्म व अन्याय वाढतो, त्या त्या वेळी असे अवतारी पुरुष जन्माला येतात.

प्रत्यक्ष आपल्या उदाहरणाने व उपदेशाने जगाला ते सन्मार्ग दाखवितात. ह्या चोवीस तीर्थंकरातील वृषभनाथ हा पहिला तीर्थंकर. वृषभनाथ म्हणजे बाहुबलीचे वडील.

वृषभनाथही राजकुलात जन्मले. त्यांच्या राज्याची राजधानी अयोध्या. वृषभनाथाला दोन पत्नी होत्या. यशस्वतीदेवी आणि सुनंदादेवी. त्याचे राज्य समृद्ध व प्रगत होते. राज्यात सर्वत्र समाधान आणि शांती नांदत होती.

कालांतराने राणी यशस्वतीला शंभर पुत्र झाले. भरत हा सर्वांत जेष्ठ पुत्र. त्यानंतर एक कन्या जन्माला आली. तिचे नाव सुंदरी. वृषभ-नाथाची कनिष्ठ पत्नी सुनंदादेवी. हिला फक्त एक पुत्र व एक कन्या होती. पुत्र बाहुबली व कन्या ब्राह्मी.

शंभराहून अधिक पुत्र झाल्यामुळे वृषभ-नाथांना अमर्याद आनंद झाला. तीन-चार वर्षे निघून गेली. राजपुत्रांना शिक्षण देण्याचा समय आला. ह्या शंभराहून अधिक असलेल्या पुत्रांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे सोपे नव्हते. पण,

वृषभनाथ अत्यंत बुद्धिमान व चतुर होते. त्यांनी स्वत:च राजपुत्रांना शिक्षण देण्यास आरंभ केला. भरतास नाट्यशास्त्र व त्यावरोबरच अर्थशास्त्राचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. बाहुबलीला शस्त्र-विद्या, अश्वविद्या, वैद्यक व इतर अनेक शाखांचे शिक्षण मिळू लागले. शिक्षण देताना राजपुत्रांची मन:प्रवृत्ती व आवड लक्षात घेतली जाई.

राजपुत्रांचे अध्ययन सुरू होते. राजपुत्र भरत हा मोठेपणी सम्राट होणार अशी लक्षणे बाल-पणापासूनच दिसत होती. बाहुबली हा त्याच्या नावाप्रमाणेच बलवान होता. तो युद्धकलेत अत्यंत निष्णात असून शूर होता. मल्लविद्येत प्रवीणच नव्हे तर अजिंक्य होता. हत्तीच्या पिलांसोबत खेळताना तो देहभान विसरत असे. 'भीती' ही भावना त्याला माहीतच नव्हती.

राजकुमारांची ही प्रगती पाहून राजा-राणींना धन्य वाटत असे.

एके दिवशी एक घटना घडली. स्वर्गाचा राजा इंद्र ह्याने आपल्या दरबारातील एका अप्सरेचे नृत्य वृषभनाथाच्या राजसभेत करण्याचे

ठरविले. अप्सरेचे नाव नीलांजना. नीलांजना सौदर्यवती असून नृत्यकलेत निष्णात होती. पण नीलांजनेचे नृत्य जसजसे रंगात येऊ लागले तसतशी ती मृत्यूच्या जवळ जाऊ लागली. ती मरून खाली पडणार तोच देवेंद्राने आपल्या दैवी शक्तीच्या बळावर तिचे नृत्य सुरू ठेवले. वृषभनाथांचा रसभंग होऊ नये म्हणून देवेंद्राने आपल्या दैवी शक्तीचा वापर केला.

काय घडत आहे हे कुणालाच कळत नव्हते; पण राजा वृषभनाथाने नीलांजनेत झालेला बदल ओळखला. राजाच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्याला जीवनाविषयी घृणा वाटू लागली.

राजा विचारमग्न बनला. त्याला वाटले– "जीवन असेच क्षणभंगुर आहे काय? ह्या भौतिक सृष्टीतील प्रत्येक वस्तू आणि प्राणी क्षणजीवी आहे; नश्वर आहे; सर्व गोष्टींचा शेवट मृत्यूतच होतो. जीवन म्हणजे पाण्यावरील बुडबुडा ! सृष्टीतील प्रत्येक वस्तू बाह्यत: इंद्रधनुष्याप्रमाणे मोहक दिसते, पण इंद्रधनुष्यासारखीच क्षणिक असते. मानवी जीवनही असेच.

इंद्रधनुष्यासारखे ! जीवन उत्पन्न होते तसेच एकाएकी नष्टही होते. ह्या सृष्टीत काहीही शाश्वत नाही, चिरंतन नाही. सर्वच क्षणिक !"

वृषभनाथाने निर्णय घेतला, पुरे हे जीवन ! त्याने आपले राज्य व स्त्री–पुत्र ह्यांचा त्याग करण्याचे ठरविले. वनात जाऊन तपस्या करावी, परमेश्वराचे चिंतन करावे, असा निश्चय केला.

झालेला प्रसंग अगदीच क्षुल्लक व अनपेक्षित ! पण त्या घटनेने राजाच्या मनात स्थित्यंतर घडून आले. राजा अंतर्बाह्य बदलला.

**पुत्रांची राजवट**

राजा वृषभनाथाने राज्यत्याग केला. जेष्ठ पुत्र भरताला त्याने अयोध्येचे व बाहुबलीला पौदनपुरचे राज्य दिले. इतर राजपुत्रांना उरलेली लहान लहान राज्ये दिली. राज्यत्याग करताना त्याने उपदेश केला, "धर्माने व न्यायाने राज्य करा. प्रजेच्या कल्याणाची काळजी घ्या." राजपुत्रांना आशीर्वाद मिळाला. वृषभनाथाने सर्वसंगपरित्याग केला. मुक्ती मिळविण्यासाठी तपस्या करण्यास तो निघून गेला.

वडिलांच्या उपदेशाप्रमाणे सर्व राजपुत्रांनी आपले राज्य नीतीने व शहाणपणाने चालविले. सत्ता व वैभव पायाशी लोळत होते. प्रजाही सुखी, आनंदी व समाधानी होती.

कित्येक वर्षे निघून गेली.

एके दिवशी राजपुत्र भरत राजसभेत आपल्या सिंहासनावर बसला होता. तोच त्याच्या दूतांनी त्याला सुखविणाऱ्या वार्ता त्याच्या कानावर घातल्या. त्याच्या वडिलांना—राजा वृषभनाथांना—कैवल्यज्ञान प्राप्त झाले होते. ही पहिली वार्ता. राजाच्या शस्त्रागारात एका असामान्य शक्तिमान अस्त्राची भर पडली होती. ह्या अस्त्राचे नाव होते चक्र अथवा चक्ररत्न. कितीही बलवान शत्रू असला तरी त्याचा नि:पात करण्याचे सामर्थ्य ह्या चक्राच्या ठिकाणी होते. ही दुसरी वार्ता. राजाला अत्यानंद झाला.

ह्याशिवाय आणखी काही नव्या अद्वितीय अस्त्रांची शस्त्रागारात भर पडली होती. त्यांपैकी एक छत्ररत्न. ही एक विशाल छत्री असून त्यामुळे ऊन्ह, वादळ व पर्जन्य ह्यांपासून सैन्याचे संरक्षण

होणार होते. चर्मरत्न हे तिसरे साधन. ही एक अद्भुत जलनौका असून तिच्यात वसून सैन्याला महानदी व सागर पार करता येत असे. चवथे दण्डरत्न. ह्या अद्भुत दंडरत्नाने जंगले आणि डोंगराळ प्रदेशातून रस्ते तयार करता येत असत. त्यामुळे सैन्याची वाहतूक सुलभ होत असे. पाचवे काकिणी रत्न. त्यामुळे घनदाट अंधकारातही प्रकाश मिळत असे. ह्याशिवाय राजाला आणखी चौदा रत्ने मिळाली होती. उदाहरणार्थ, अत्यंत श्रेष्ठ जातीचा शक्तिमान गजराज, सर्वोत्तम अश्व. शस्त्रागाराप्रमाणे राजाच्या कोषागारातही नऊ प्रकारच्या संपत्तीची भर पडली होती.

ह्या सर्व वार्ता ऐकून राजाला हर्ष झाला. त्यात आणखी एका शुभ वार्तेची भर पडली. राजा भरताला पुत्रलाभ झाला होता. भरताच्या आनंदाने कळस गाठला. ह्याच आनंदी मनोवृत्तीत तो आपले पिता–वृषभनाथ–ह्यांच्या भेटीस गेला. सोबत अन्य राजपुत्र, राजकन्या व इतर राजवंशीय स्त्री-पुरुष होते. असंख्य नागरीकही आलेले होते. सर्वांनी वृषभनाथांची भक्तिपूर्वक पूजा केली. ‘सन्मार्गाने व न्यायाने वागा,’ असा वृषभनाथांनी

उपदेश केला. सर्वजण आपआपल्या राज्यात परतले.

वृषभनाथांची भेट घेऊन परतल्यानंतर भरताने आपल्या पुत्राचा नामकरण-विधी साजरा केला. त्यानंतर 'चक्ररत्न' ह्या अद्भुत व अलौकिक अस्त्राची मोठ्या भक्तिभावाने पूजा केली.

**भरताचा दिग्विजय**

भरत हा स्वत: अत्यंत शूर व युद्धकुशल राजा होता. त्यातच त्याच्या शस्त्रागारात नवीन नवीन असामान्य अस्त्रांची भर पडलेली. राजभांडार संपन्न व समृद्ध. साहजिकच त्याचा अहंकार व महत्त्वाकांक्षा वाढू लागली. आपण दिग्विजय करावा, सम्राट व्हावे असे त्याला वाटू लागले.

भरताजवळ विशाल सैन्यदल होते. पायदल, अश्वदल, गजदल व रथदल, ह्या चतुरंगदलासह तो विजययात्रेसाठी बाहेर पडला. तत्पूर्वी त्याने ईश्वराची पूजा केली व आशीर्वाद प्राप्त करून घेतला. रणवाद्ये दुमदुमू लागली.

भरत एका बलवान रथावर आरूढ झाला. त्याचे सैन्य सागरासारखे विशाल दिसत होते. सैनिकांच्या मुद्रेवर उत्साह व वीरश्री होती. चक्ररत्न

समोर सरकू लागले. पाठोपाठ सैन्य चालू लागले. प्रारंभी भरताचे सैन्य पूर्वेकडे वेगाने जाऊ लागले.

भरताला एकामागोमाग एक विजय प्राप्त होऊ लागले. मगध नरेश, विजयार्धकुमार, कृतमला इत्यादी शूर व शक्तिमान राजांचा पराभव झाला. ते शरण आले. भरताला पराभव माहीतच नव्हता. तो अजिंक्य होता. ज्या राजांनी विरोध केला त्या सर्वांचाच पराजय झाला. पराभूत राजांनी नजराणा आणि करभार म्हणून रत्ने, सोने व इतर विविध प्रकारची संपत्ती भरताला दिली. भरताचे विजयी सैन्य जयघोष करीत चहू दिशांना चालून गेले. भरताच्या ह्या दिग्विजयामुळे तो आता नुसता राजा न राहता सम्राट बनला

अशा रीतीने, चक्ररत्नाच्या अद्भुत व अलौकिक सामर्थ्यामुळे भरताने विजयमालिका प्राप्त करून घेतली. शेवटी तो व त्याचे सैन्य विजयघोषाच्या निनादात अयोध्येला परतू लागले.

एकामागून एक मिळालेल्या विजयामुळे भरताचा अहंकार अधिकाधिक वाढत गेला. त्याला

वाटले–"आपल्या सारखा पराक्रमी व दिग्विजयी सम्राट भूतकाळात झाला नसेल व भविष्यात होणार नाही. मी ह्या संपूर्ण पृथ्वीचा अधिपत्ती आहे. मला विरोध करण्याची कुणाची छाती आहे ?"

असे विचार मनात असताना त्याला असेही वाटले की आपले नाव जगात चिरंतन राहावे म्हणून ते वृषभाचलाच्या शिखरावर कोरून ठेवावे. त्यामुळे ते युगानुयुगे कायम राहील. जनतेला त्याचा कधीही विसर पडणार नाही.

अयोध्येच्या मार्गावर असताना त्याला वृषभाचल नावाचा भव्य व उंच पर्वत दिसला. तो पर्वतावर चढून आला. पण त्याचे दुर्दैव ! त्या भव्य पर्वतावर सहस्रावधी नावे कोरली होती. कुठेही रिकामी जागा नव्हती.

ह्याचा अर्थ स्पष्ट होता. भरत हाच काही एकमेव दिग्विजयी सम्राट नव्हता. त्याच्यासारखे असंख्य सम्राट पूर्वी होऊन गेले होते. त्या सर्वांच्या विजयगाथा त्या पर्वतावर कोरल्या होत्या. आपल्या-सारखा असामान्य पराक्रमी सम्राट ह्यापूर्वी

कधीही झाला नाही व पुढेही होणे शक्य नाही हा त्याचा दर्प व्यर्थ होता; निरर्थक होता. पृथ्वीमातेला शूर पुत्रांची उणीव कधीच नव्हती.

शौर्याचा आणि संपत्तीचा अभिमान व्यर्थ आहे. हेच जणू तो वृषभाचल त्याला सांगत होता. त्याचे डोळे उघडले, अभिमान गळाला उन्मत्तपणा लज्जित झाला. पण क्षणमात्रच.

पुन: त्याचा अहंकार जागृत झाला. त्याला वाटले आपली विजयगाथा ह्या पर्वतावर कोरलीच पाहिजे. त्याने आपला दण्डरत्न हाती घेतला. पूर्वीच्या काही राजांच्या पराक्रमगाथा दण्ड-रत्नाच्या साह्याने पुसून टाकल्या; आणि आपल्या काकिणीरत्नाचा उपयोग करून आपली गौरव-गाथा त्या पर्वतावर कोरून काढली.

त्यानंतर तो आपल्या वडिलांकडे गेला. त्याने वृषभनाथांची पूजा केली. आशीर्वाद घेतला; आणि शेवटी जयघोषात तो अयोध्येला परतला.

**पण असे का ?**

राजा भरत दिग्विजय संपादून परत येत आहे ही वार्ता अयोध्येच्या प्रजेला कळली. प्रजेला

उत्साहाची व आनंदाची भरती आली. विजयी राजाच्या स्वागताची यथोचित तयारी करण्यात आली.

नागरिकांनी संगीताचे सूर ऐकले. राजा अयोध्येच्या प्रवेशद्वाराजवळ येत होता. राजा आणि त्याचे सैन्य प्रवेशद्वारातून आत शिरणार तोच दुर्दैव आडवे आले. सैन्याच्या अग्रभागी चालत-फिरत असलेले ते दिव्य चक्ररत्न एकाएकी थांवले.

प्रत्येकजण चरकला, चकित झाला. असे का ? ज्या चक्रासमोर मोठमोठे राजे नम्र झाले, शरण आले ते अद्वितीय चक्र एकाएकी का थांवले ? कसे थांवले ? त्याची गती का कुंठित झाली ? राजा भरत अस्वस्थ झाला. बेचैन झाला. ह्या घटनेचा अर्थ उघड होता. ज्याला भरताने अजूनही जिंकले नाही असा त्याचा शत्रू कुठेतरी जिवंत होता. कोण असावा ? कुठे असावा ? अजिंक्य भरत आश्चर्यमूढ बनला.

भरताने आपल्या राज्यावाहेरचे सर्व शत्रू पराभूत केले होते; तरीही ते चक्र थांवले.

राजधानीच्या बाहेर थांबले. ह्याचा अर्थ त्याचे शत्रू राज्यावाहेरचे नसून राज्यातील–घरातील होते.

भरताने राजपुरोहिताला बोलावले. प्रश्न केला––“हे चक्ररत्न प्रवेशद्वाराजवळ का बरे थांबले असावे ? माझ्याच राज्यात माझा शत्रू कोण बरे असावा ?” पुरोहिताने उत्तर दिले–“ हे राजन्, तू राज्यावाहेरील सर्व शत्रूंना जिंकले आहेस. हा शत्रू आपल्याच राज्यातील आहे. तो तुझा कोणतातरी भाऊ असावा. त्याला वाटत असावे की भरताप्रमाणेच आपणालाही वडिलाने राज्य दिले आहे. आपण भरताला शरण का जावे ? सर्व भावांत वाहुवली हा अत्यंत स्वाभिमानी आहे. तू सम्राट असलास तरी तो तुझी मुळीच पर्वा करीत नाही.”

पुरोहिताचे हे भाषण ऐकून राजाला क्रोध आला. तो म्हणाला––“ त्या सर्वांनी इथे यावे, शरणागती पत्करावी; नाहीतर मी युद्ध करून आपल्या पराक्रमाने त्यांना नमवीत.” असे म्हणून त्याने प्रत्येक भावाला, ‘ मला शरण यावे ’, अशा अर्थाच्या राजाज्ञा लिहून पाठविल्या. शंभर भावां-

पैकी वाहुवली सोडून सर्वांनी विचार केला, "आपला वडीलभाऊ आपल्याला पित्यासमान आहे. राज्यलोभासाठी भाऊबंदकी करणे व रक्तपात घडविणे योग्य नाही." म्हणून त्या सर्वांनी खुषीने राज्यत्याग केला. पण सम्राट म्हणून भरताला मान्यता मात्र दिली नाही. त्याला ते शरणही गेले नाहीत. सर्वजण संन्यासी वनून आपल्या वडिलांकडे वृषभनाथांकडे–गेले व तपस्या करू लागले.

ही वार्ता भरताला कळली. त्याला आश्चर्य वाटले. तसेच भावांच्या त्यागाविषयी आदरही वाटला. त्यांचा मोठेपणा त्याने मनोमन मान्य केला.

प्रश्न फक्त वाहुवलीचा होता. तो आपले सार्वभौमत्व मान्य करील काय ? शरणागती स्वीकारील काय ? त्यापेक्षा तो युद्ध करणेच पत्करील असे त्याला वाटू लागले.

वस्तुतः भावाच्या पराक्रमी विजयगाथेमुळे वाहुवलीला आनंद झाला होता. पण, भरताच्या पत्रामुळे त्याचा स्वाभिमान, दुखावला होता. वाहुवलीकडे गेलेला राजदूत परत आला. वाहुवलीचा स्वाभिमानी निरोप त्याने भरताला कळवला.

वाहुवली म्हणाला होता–“भरत जरी सर्व-जगाचा सम्राट असला तरी तो माझा सम्राट नव्हे. हे राज्य मला वडिलांनी दिले आहे. मी भरतासमोर कधीही नम्र होणार नाही. युद्धाचा प्रसंग आलाच तर मी युद्धास सिद्ध आहे.”

हा अपेक्षित निरोप ऐकताच भरताने युद्धाची सिद्धता केली. त्याने सैन्याला आज्ञा केली. त्याचे चतुरंग दल पौदनपूरच्या दिशेने चालू लागले. सैन्याच्या आघाडीला ते शक्तिमान चक्ररत्न होते. त्यांच्या संचलनामुळे धूळ उडाली व तिने आकाश व्यापून टाकले.

वाहुवलीही आपल्या सैन्यासह युद्धास सिद्ध झाला. दोघांच्या सेना एकमेकीवर झडप घालून परस्परांचा विध्वंस करण्याच्या तयारीत होत्या.

युद्धाची ठिणगी पडणार–पण, तत्पूर्वी दोन्ही सैन्यातील काही विचारी व्यक्ती आणि राज्यमंत्री एकत्र जमून विचारविनिमय करू लागले. भरत आणि वाहुवली हे दोघे असामान्य योद्धे आहेत. दोन्ही सैन्यांचा पूर्णपणे विनाश झाल्याशिवाय ते परस्परांना जिंकू शकणार नाहीत. असा सैन्य-




"मी भरतासमोर कधीही नम्र होणार नाही. युद्धाचा प्रसंग आलाच तर मी युद्धास सिद्ध आहे."






" हे राज्य तूच घे. मी तप करण्यासाठी अरण्यात निघून जातो."

संहार होण्याऐवजी दोघांनीच द्वंद्वयुद्ध करावे. द्वंद्वयुद्धाचा निर्णय मान्य करावा. त्यामुळे सैन्याचा व्यर्थ संहार होणार नाही. तो टाळता येईल.

**भरत व बाहुबलीचे द्वंद्वयुद्ध**

दोन मंत्र्यांचे शिष्टमंडळ प्रथम भरताकडे गेले. त्यांनी युद्धामुळे घडून येणाऱ्या भयानक परिणामाचे वर्णन केले; शेवटी भरताला प्रार्थना केली—"तुम्ही दोघांनी द्वंद्वयुद्ध करून हा भयानक संहार टाळावा."

हा प्रस्ताव ऐकून भरत खुष झाला नाही; कारण त्यामुळे त्याला आपल्या प्रचंड सेनेचे व अद्‌भुत अस्त्रांचे सामर्थ्य दाखविण्याची संधी मिळणार नव्हती. पण त्याने आपल्या मनातील हा विचार बोलून दाखविला नाही. द्वंद्वयुद्धाच्या सूचनेला नाखुषीनेच त्याने मान्यता दिली.

त्यानंतर ते दोन प्रधान बाहुबलीकडे गेले. त्याला तीच विनंती केली. बाहुबली म्हणाला, "भरत गर्विष्ठ आहे. त्याला वाटते की जगात कुणीही आपल्या सैन्याचा पराभव करू शकणार नाही, म्हणून प्रथम त्याच्या सैन्याचा पराभव

करणे आवश्यक आहे. नंतरच द्वंद्वाचा विचार करणे योग्य होईल."

पण प्रधानांनी आपला आग्रह सोडला नाही. ते म्हणाले--"युद्ध हे विनाशक आहे. त्यामुळे हजारो सैनिकांचा वध होईल. विविध प्रकारचे दु:ख सहन करावे लागेल. उलट, द्वंद्वामुळे हा विनाश टाळता येईल. निष्कारण प्राणहानी होणार नाही. भरताने द्वंद्वाला मान्यता दिली आहे, आपणही ही सूचना मान्य करावी." त्यांनी पुन: पुन: वाहुवलीला युद्धसंहार टाळण्याची विनंती केली. ज्येष्ठ व अनुभवी मंत्र्यांच्या आग्रहाखातर वाहुवलीने त्यांचे म्हणणे मान्य केले.

भरत आणि वाहुवली दोघेही भाऊच. दोघेही कसलेले योद्धे. ह्यात द्वंद्वाचा निर्णय तरी काय होणार ? कोण विजयी होईल ?

भरताला आत्मविश्वास होता. त्याला वाटले, "मी संपूर्ण पृथ्वी जिंकली आहे. वाहुवलीचा पराभव मी करू शकणार नाही काय ?" वाहु-वलीला वाटत होते–"इतर राजांप्रमाणे भरताला माझा पराभव करणे सोपे नाही."

रणशिंगे वाजली. आता युद्ध सुरू होणार. पण ते धर्मयुद्ध होते, नीतियुद्ध होते. कारण, त्यामुळे फार मोठा मानवसंहार टळणार होता.

त्याकाळच्या पद्धतीप्रमाणे असल्या द्वंद्वयुद्धाचे ठराविक नियम असत. अनुक्रमही असे. प्रथम नेत्रयुद्ध होत असे. ह्या नेत्रयुद्धानुसार दोन्ही योद्धयांनी परस्पराकडे डोळयांची बाहुली व पापणी न हलविता एकसारखे पाहावयाचे. ज्याची पापणी प्रथम हलेल तो पराभूत समजला जात असे.

द्वंद्व सुरू झाले. दोन बलाढ्य योद्धे परस्पराकडे नजर रोखून पाहात होते. जणू आपल्या तीक्ष्ण दृष्टीने एकमेकांना गिळू पाहात होते; जाळू पाहात होते. ह्या प्रथम फेरीत बाहुबली विजयी झाला.

द्वंद्वाची दुसरी फेरी सुरू झाली. ते जलयुद्ध होते. परस्परांनी परस्परावर हातांनी पाणी उडवायचे, झोकायचे. दोघेही एका सरोवरात शिरले. जणू दोन मत्त गजराज एकमेकांवर सर्व शक्तीने पाणी उडवीत होते. भरतापेक्षा बाहुबली उंच होता. भरताने क्रोधाच्या आवेशात आपली

सर्वशक्ती पणास लावून पाणी उडवले. वाहुवली उंच. ती जलवृष्टी फक्त त्याच्या वक्षस्थला पर्यंतच पोहचली. उलट, वाहुवलीने झोकलेले पाणी भरताच्या डोक्यावर व चेहऱ्यावर येऊन आदळले. भरत रागाने आणखी भडकला. भरताला तो पाण्याचा मारा सहन झाला नाही. त्याला पराभव मान्य करावा लागला. तो खिन्न झाला.

आता फक्त तिसरी व शेवटली फेरी उरली होती. मल्लयुद्धाची. दोघेही निष्णात मल्ल होते भरताने वाहुवलीचा पराजय करण्याचा निश्चय केला.

मल्लयुद्धाला आरंभ झाला. दोघेही निग्रही व वलवान होते. परस्परांचा पराभव करावयाचा ह्या ईर्षेने पेटलेले ! कुणीच मागे हटेना. अखेरीस बाहुवलीने अचानक भरताला हवेत उचलले. प्रेक्षक थरारले. वाहुवली भरताला जमिनीवर आदळणार की काय ?

पण वेगळेच आश्चर्य घडले. बाहुवलीने आपल्या वडील भावाला अगदी अलगद् जमिनीवर ठेवले. भरत जमिनीवर आला. पण त्याचे सर्व

शरीर रागाने थरथरत होते. आपल्या दुर्दैवावर तो संतापला होता.

संपूर्ण पृथ्वी जिंकणारा, स्वत:ला सम्राट म्हणविणारा भरत आज आपल्याच धाकट्या भावाकडून पराभूत झाला होता. संपूर्ण सेना-सागर त्याच्या पराभवाचे चित्र पाहात होता. केवढा हा अपमान ! केवढे हे दुर्दैव ! भरताला तो अपमान असह्य झाला. तो अचानक आपल्या शक्तिमान चक्ररत्नाजवळ आला. " जा ! आणि बाहुबलीला ठार कर," त्याने चक्ररत्नाला आज्ञा केली. ते तेजस्वी व अलौकिक अस्त्र बाहुबली-कडे जाऊ लागले.

दोन्ही सैन्ये व उपस्थित नागरिक भयचकित झाले. थरारले, त्यांना वाटले – " भरताने हे काय केले ! हे धर्मयुद्ध आहे काय ! स्वत:चा पराभव झाल्यानंतर आपल्या भावाविरुद्ध चक्र अस्त्राचा उपयोग करणे हे न्याय्य आहे काय ? हे चक्र बाहुबलीचा वध करील. केवढा हा अन्याय !" सर्वजण आपआपले श्वास रोखून–डोळे फाडून–भयग्रस्त मुद्रेने त्या अन्यायी

कृत्याकडे पाहात होते.

पण–आणखी एक आश्चर्य घडले. त्या चक्ररत्नाने बाहुबलीला प्रदक्षिणा घातली. नंतर ते अस्त्र त्याच्या उजव्या बाजूला येऊन थांबले.

लोक चकित झाले. आनंदाने ओरडू लागले. देवदूत आकाशातून पुष्पवृष्टी करू लागले. राजा भरत खाली मान घालून उभा होता.

बाहुबलीने एकवार त्याच्याकडे पाहिले. हाच तो भरत. वृषभनाथांचा पुत्र. चक्ररत्नाचा स्वामी. जगाचा सम्राट पण तोच सम्राट भरत लज्जेमुळे खाली मान घालून दोन्ही सेनेसमोर उभा होता. बाहुबलीचे हृदय दयेने भरून आले. त्याचा राग वितळला. रागाऐवजी त्याला करुणा वाटू लागली.

बाहुबली विचार करू लागला. "भरत आणि आपण परस्परांचे भाऊ. भरत वडील, मी धाकटा. दोघेही एकत्र खेळलो–वाढलो, परस्पराशी प्रेमाने वागलो. पण तेच भाऊ आता परस्पराशी युद्ध करीत होते. आपल्या धाकट्या भावाला ठार करावयाचे असा भरताचा निश्चय होता.

कशासाठी ? कारण काय ? केवळ राज्यलोभ. राज्यलोभासाठी भाऊ परस्परांचा वध करावयास सिद्ध होतात. बंधुत्व विसरले जाते. हा सर्व वासनेचाच खेळ. वासना ही अत्यंत वाईट. नराला ती पशू बनविते. बाहुबलीला पश्चात्ताप झाला. जीवनासंबंधी तो उदासीन झाला.

**'हे राज्य ! ते तूच घे'**

बाहुबली अंतर्मुख बनला त्याला वाटू लागले, "नको ही सत्ता आणि तिची लालसा ! उत्तम उपाय एकच–सर्वस्वाचा त्याग आणि परमेश्वरासाठी तप." तो भरतासमोर वाकला. भावाला नमस्कार करून तो म्हणाला, "हे बंधो, मला क्षमा कर. तुझ्याशी युद्ध करण्यात मी पाप केले. तुलाही लज्जित केले. मला नको हे राज्य ! ते तूच घे ! मी तप करण्यासाठी अरण्यात निघून जातो आणि माझी सर्व पापे धुऊन काढतो. कृपा करून मला अनुमती दे."

भरतही बदलला होता. त्याची सम्राट होण्याची महत्त्वाकांक्षा, त्याचा क्रोध, त्याचा दुराग्रह वाफेप्रमाणे उडून गेला.

वाहुवलीच्या उदात्ततेने तो भारावून गेला. आपला भाऊ तपस्या करण्यासाठी अरण्यात जात आहे हे पाहून त्याला दु:ख झाले. त्याच्या डोळयांतून अश्रुधारा वाहू लागल्या. त्याने पायाशी वाकलेल्या आपल्या भावाला उठवले. तो म्हणाला, " हे बंधो, मीही पापीच आहे. माझ्या अहंकारामुळे, अविचारामुळे माझे सर्व भाऊ तपासाठी अरण्यात निघून गेले. आता तूही जात आहेस. मग माझ्याजवळ कोण राहील ? सर्व भाऊ गेले; तूच एकटा उरला आहेस. तुला मी कसा सोडू ? ह्या राज्याचे मी काय करू ? मी प्रार्थना करतो की तूं जाऊ नकोस." असे म्हणून त्याने वाहुवलीचे दोन्ही हात धरले आणि त्याला विनविले.

पण, वाहुवलीचा निर्णय पक्का होता, मन निश्चल होते. भरताच्या विनवणीचा त्याच्या मनावर कोणताही परिणाम झाला नाही. त्याने खरोखरच सर्वस्वाचा त्याग केला आणि तो निघून गेला.

वाहुवली वृषभनाथांकडे गेला. तपाची दीक्षा

घेतली. त्याने उग्र तप सुरू केले. अंगावरील वस्त्रांचेही त्याला भान उरले नाही. दिवसामागून दिवस निघून गेले, पण तो सतत एकाच ठिकाणी उभा होता. अगदी निश्चल व शांत. अन्नपाणी नाही, झोपही नाही. त्याच्या शरीराभोवती मुंग्यांचे वारूळ वाढले आणि त्या वारुळाच्या ढिगाऱ्याने त्याला झाकून टाकले. त्याच्या शरीरावरून मोठमोठे सर्प जात–येत. त्याच्या अवयवांभोवती वेलींचे जाळे तयार झाले. त्यात पक्षी घरटे करीत. केसांच्या जटा बनल्या; तरीही तो कचरला नाही. तो स्थिर होता, सतत उभा होता. त्याचे शरीर वारा, वीज, वादळ व पर्जन्य ह्यांचा मारा सहन करीत उभे होते. कठोर इच्छाशक्तीने, पोलादी मनाने त्याने आपली कठोर तपश्चर्या सुरू ठेवली.

वर्षामागून वर्षे गेली, तरीही त्याला अंतिम परमज्ञान प्राप्त झाले नाही.

## ‘ मी ’पणाचा त्याग

अत्यंत उग्र तपस्या करूनही बाहुबलीला परमज्ञान प्राप्त झाले नाही. हे पाहून भरताला



"हे राज्य माझे नव्हेच. तू जिंकून घेतलेले हे राज्य मला उदारपणे तूच परत केले आहेस."

आश्चर्य वाटले, चिंता वाटली; भरत आपल्या वडिलांकडे गेला. बाहुबलीला ज्ञानप्रकाश का प्राप्त झाला नाही, ह्याचे कारण विचारू लागला. वृषभनाथ म्हणाले, "बाहुबली अत्यंत कठोर तप करीत आहे हे खरे; पण त्याने अजूनही आत्म-प्रेमाचा, 'मी'पणाचा त्याग केलेला नाही. त्याला असे वाटते की आपण ज्या भूमीवर तपस्या करीत आहोत ती आपली नव्हे, आपल्या भावाची आहे; त्याने सर्व राज्य तुला देऊन टाकले आहे, म्हणून ही भूमी तुझी आहे. त्याच्या मनात अजूनही 'मी–तू'पणाची भावना आहे. ही भावना–हे दुःख त्याला सलत आहे. अजूनही त्याचा अहंकार विरला नाही. अशा स्थितीत ज्ञानप्रकाश कसा लाभणार ?"

वडिलांचे हे भाषण ऐकून भरत बाहु-बलीकडे गेला. त्याला वंदन करून तो म्हणाला– "प्रिय बंधो ! तू माझ्या राज्यात आहेस, ही भावना सोडून दे. असा विचार येणे ही एक प्रकारची आसक्ती–ममता–आहे. हे राज्य माझे नव्हेच. तूं जिंकून घेतलेले हे राज्य मला उदारपणे

तूच परत केले आहेस. वस्तुतः ही पृथ्वी कुणाच्याही मालकीची नाही; म्हणून तू ही आत्म प्रतिष्ठेची भावना सोडून तप सुरू ठेव."

ह्या सूचनेचे मर्म बाहुबलीने जाणले. त्याच्या मनात अल्पांशाने वास करीत असलेली आसक्तीची–आत्मनिष्ठेची भावना विरून गेली.

ह्यापूर्वी धाकट्या भावाने–बाहुबलीने–वडील भावाच्या मनात असलेली अहंभावना नष्ट केली होती. आता उलट घडले. वडील भावाने धाकट्या भावात असलेली अहंभावना धुऊन काढली.

आता बाहुबली निष्काम भावनेने तप करू लागला. आपला 'स्व' विसरून त्याने तप सुरू ठेवले. ह्यामुळे त्याला ज्ञानप्रकाश दिसला, परमज्ञान प्राप्त झाले. स्वर्गातील दुंदुभीचा आनंदघोष होऊ लागला. जनतेने बाहुबलीचे मोठेपण मान्य केले. त्याची प्रशंसा होऊ लागली. लोक त्याची भक्तिभावाने पूजा करू लागले. त्याचा उपदेश ऐकून ते स्वतःला धन्य समजू लागले.

बाहुबलीने अनेक देशांना भेटी दिल्या. लोकांना नीतीचा उपदेश केला. अर्थपूर्ण जीवन

कसे जगावे हे शिकविले. शेवटी, ह्याच बाहुबलीने आपल्या वडिलांच्याही आधी मोक्ष प्राप्त करून घेतला.

बाहुबली हा नावाप्रमाणेच बलवान व शूर. प्रखर स्वाभिमानी. त्याने मनात आणले असते तर आपल्या भावाचा अहंकार ठेचून तो स्वत: सम्राट होऊ शकला असता; पण त्याने स्वपराक्रमाने जिंकलेले भावाचे राज्य त्याला परत केले आणि आपण स्वत: अरण्यात गेला. कठोर तप केले. सत्याचा मार्ग शोधून काढला; मोक्ष प्राप्त करून घेतला स्वत:च्या हृदयातील ईश्वरी ज्ञानाच्या प्रकाशात लोकांचीही हृदये उजळली. त्यांतील अंध:कार नाहीसा केला. स्वत: संत बनला. मुनी बनला. जग त्याची प्रशंसा करू लागले.

सम्राट भरताला वाटले की आपल्या त्यागी व तपस्वी भावाची कीर्ती चिरंतन करावी. त्याचा लौकिक जगात दरवळावा म्हणून त्याने पौदनपूर येथे बाहुबलीचा रत्नजडित पुतळा तयार केला. लोकांनी मोठ्या समारंभाने त्या मूर्तीची पूजा केली.

असे म्हणतात की हा पौदनपुरचा पुतळा समुद्रात बुडाला; पण अजूनही बाहुबलीच्या शिल्प-मूर्ती श्रवणबेळगोळा, वेनूर, कारकळ, श्रावणगुड्डा, बास्तीहल्ली आणि धर्मस्थळ येथे आहेत. सर्वात प्रचंड, भव्य व प्रसिद्ध शिल्पमूर्ती श्रवणबेळगोळा येथे आहे. ती अत्यंत आकर्षक व भव्योदात्त आहे. ह्या पुतळ्याची कथा मोठी रसपूर्ण आहे.

**स्वप्न आणि शिल्पमूर्ती**

गंग घराण्यातील राजा राचमल्ल हा तलवण-पूर येथे राज्य करीत होता. चावुंडराय हा त्याचा प्रधान. त्याच्या वडिलाचे नाव महाबलय्या व आईचे कळलदेवी. चावुंडराय हा अत्यंत शूर, चतुर व मनाने थोर असून ईश्वरभक्त होता.

एकदा कळलदेवीने पुरोहिताकडून भरत व बाहुबलीची कथा ऐकली. तिला वाटले, बाहुबलीचा तो रत्नजडित पुतळा अजूनही पौदनपूर येथे असावा. त्या पुतळ्याचे दर्शन घेण्याची उत्कट इच्छा तिच्या मनात उत्पन्न झाली. एवढेच नव्हे तर बाहुबलीची मूर्ती पाहिल्याशिवाय पेलाभर दूध-देखील प्यायचे नाही असा तिने पण केला.

वस्तुत: भरत आणि बाहुबलीची कथा अत्यंत प्राचीन. हजारो वर्षापूर्वीची. तो पुतळा आणि ते पौदनपूर नगरही नष्ट झाले होते. तो पुतळा पाहिलेली कोणतीही व्यक्ती जिवंत नव्हती. लोक म्हणत, तो पुतळा समुद्रात लुप्त झाला असावा अथवा हिंस्र पशूंनी भरलेल्या घनदाट अरण्यात तो असावा. मग तो दिसणार कसा ?

आईचा निश्चय होता की बाहुबलीच्या पुतळ्याचे दर्शन झाल्याशिवाय अन्नपाणी घ्यायचेच नाही. आईने चावुंडरायाला पुतळ्याचा शोध घेण्यास बजावले. चावुंडरायाला चिंता पडली, पण काळलदेवी कोणतीही सबब ऐकायला तयार नव्हती.

अखेर, चावुंडराय आपल्या आईला व काही सहकारी मंडळींना घेऊन पौदनपूरच्या शोधासाठी निघाला. त्यांचा प्रवास अखंड सुरू होता, पण पौदनपूरचा शोध लागला नाही.

बराच लांब व बराच काळ प्रवास केल्यानंतर ते चंद्रगिरी नावाच्या टेकडीजवळ आले. टेकडीच्या पायथ्याशी थांबले. विश्रांती घेतली.

त्याच रात्री चावुंडरायाला एक स्वप्न दिसले.

स्वप्नात दिव्य योनीतील एक व्यक्ती दिसली. ती स्त्री असून तिचे नाव 'कुष्मांडिनीदेवी' होते. देवी म्हणाली—"कोणत्याही मानवाला भरताने केलेली बाहुबलीची मूर्ती दिसणार नाही. मग ते कितीही प्रयत्न करोत. पौदनपूरही दिसणार नाही. व्यर्थ प्रयत्न करण्याऐवजी तू त्या टेकडीवर उभा राहा. चंद्रगिरी टेकडीच्या अगदी समोर इंद्रगिरी टेकडी आहे. चंद्रगिरी टेकडीवर उभा राहून एक सुवर्ण बाण इंद्र-गिरीच्या शिखरावर असलेल्या शिलाखंडावर मार; म्हणजे तुला भगवान बाहुबलीची मूर्ती दिसेल."

स्वप्नातच चावुंडरायाने धनुष्य-बाण हाती घेतला. नेम धरला. त्या शिलाखंडावर बाण मारला. भयानक आवाज झाला. शिलाखंड दुभंग झाला. त्या दोन तुकड्यांमध्ये बाहुबलीची भव्य व सुंदर मूर्ती उभी होती.

तोच, चावुंडरायाचे स्वप्न भंग झाले. तो जागा झाला. डोळे उघडून पाहू लागला. काहीच दिसेना. पुन: पुन: डोळे पुसले. सभोवार दृष्टी टाकली. तरीही काहीच दिसत नव्हते. देवीही नव्हती आणि मूर्तीही नव्हती. केवळ स्वप्न. त्याला

वाटले, "खरोखर, ते स्वप्न जर खरे झाले असते तर आपणाला किती आनंद झाला असता."

सकाळी उठल्यानंतर त्याने ही स्वप्नकथा आईला व इतरांना सांगितली. सर्वांनी त्या इंद्रगिरीकडे पाहिले. खरोखरच त्या टेकडीवर स्वप्नात दिसलेला शिलाखंड होता. त्याला वाटले, खरोखरच आपण बाण मारला असता आणि बाहुबली दिसले असते तर किती छान झाले असते ! पण ते कसे शक्य होते ?

परंतु, लवकरच त्या स्वप्नाचा गूढ अर्थ त्यांना स्पष्ट झाला–त्या प्रचंड शिलाखंडातूनच भगवान बाहुबलीची मूर्ती खोदून तयार केली पाहिजे !

हे काम सोपे नव्हते. त्या शिलाखंडाजवळ पोहोचणेही अशक्य होते. टेकडीच्या सभोवती घनदाट अरण्य होते. मोठमोठ्या दऱ्या, प्रचंड खळगे, मोठमोठे दगड व असंख्य काटेरी झुडपे होती. मार्ग काढावा तरी कसा ? अगदीच अशक्य ! पण, चावुंडराय अत्यंत चतुर व शूर होता. मार्ग काढलाच पाहिजे व आईची इच्छा पूर्ण केलीच पाहिजे असा त्याने निश्चय केला. कितीही अडचणी

आल्या तरी त्या शिलाखंडातून बाहुबलीचा पुतळा निर्माण करायचाच असा निर्णय त्याने घेतला.

भोवतालचे लोक चावुंडरायाच्या मदतीला धावले. काम सुरू झाले. दऱ्या व खाचखळगे बुजविण्यात आले. दगड व काटेरी झुडपे हलविण्यात आली. अशा रीतीने मोठ्या कष्टाने इंद्रगिरीच्या शिखरावर जाणारा मार्ग तयार करण्यात आला.

आता, त्या शिलाखंडातून मूर्ती तयार करावयाची होती. देशाच्या कोन्या–कोपऱ्यातून शेकडो शिल्पकार निमंत्रित केले गेले. प्रथम सर्वांनी त्या शिलाखंडाची पूजा केली. एका शुभ मुहूर्तावर खोदकामास आरंभ झाला. प्रत्येकजण रात्रंदिवस काम करीत होता. त्या घनदाट जंगलात व प्रचंड खडकात काम करणे अत्यंत कठीण होते. पण, ईश्वराचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी होते. त्यामुळे त्यांना उत्साह मिळाला. बळ लाभले. अखंड कष्ट सुरू होते. हळुहळू चावुंडरायाने स्वप्नात पाहिलेली बाहुबलीची मूर्ती आकार घेऊ लागली.

सत्तावन फूट उंचीचा, अत्यंत भव्य, डौलदार व आकर्षक पुतळा तयार झाला. मूर्ती हसरी, खादे रुंद व मुद्रा शांत. हातापायांवर वहरलेल्या वेलीची कंकणे करण्यात आली. पायाभोवती मुंग्यांची उंच वारुळे आणि त्यातून डोकावणारे सर्प. असा अद्वितीय, सुंदर व मोहक पुतळा तयार झाला.

आपल्या हातून पुतळा करण्याचे हे कार्य घडले ह्याचा चावुंडरायाला अभिमान वाटू लागला. आपली इच्छा पूर्ण झाली म्हणून त्याची आई समाधानी व आनंदी होती. लोक मोठ्या आश्चर्याने त्या पुतळ्याकडे पुनः पुनः पाहात होते, तरीही त्यांचे पूर्ण समाधान होत नव्हते. इतका तो भव्य व आकर्षक होता. ते सौंदर्य, ती भव्यता पाहून जनता आनंदाने वेडी झाली व नाचू लागली.

चावुंडरायाचे स्वप्न साकार झाले. स्वप्नात पाहिलेली वाहुवलीची मूर्ती आता त्याच्यासमोर उभी होती. त्या प्रचंड व सुंदर मूर्तीचे दर्शन घेण्यास लक्षावधी लोक जमले. सर्वजण त्या अद्‌भुत कलाकृतीची प्रशंसा करीत. आपल्या हातून एक

अद्वितीय मूर्ती घडविली गेली म्हणून चावुंडरायाला अभिमान वाटला.

### फक्त एक पेला दूध

धार्मिक विधीनुसार त्या मूर्तीला अभिषेक व्हायचा होता. चावुंडरायाने धर्मशास्त्रानुसार सर्व विधी केले. समारंभपूर्वक मूर्तीची प्रतिष्ठापना केली. मूर्तीला प्रथम स्नान घालण्याचा विधी चावुंडरायानेच पार पाडला.

ह्या स्नानविधीच्या बाबतीत एक रसपूर्ण कथा प्रचलित आहे.

पुतळ्याला स्नान घालण्यासाठी दुधाने भरलेले शेकडो घडे लोकांनी आणले. मूर्तीच्या डोक्यावर ते ओतण्यात आले. शीर्ष स्नान झाले. मूर्तीची मान, वक्षस्थल ओले झाले. पण–

कितीही दूध ओतले तरी मूर्तीचे सर्वांग भिजत नव्हते. दुधामुळे संपूर्ण शरीर ओले होत नव्हते. पुनः पुनः दूध ओतण्यात येई, पण ते दूध मूर्तीच्या नाभीपर्यंतही पोहचत नव्हते.

चावुंडराय व त्याच्या साथीदारांना मोठे आश्चर्य वाटले. ते अस्वस्थ झाले. असे का होत आहे ? कुणालाच कळेना. कोणतेच उत्तर देता येत नव्हते.

तेवढ्यात एक वृद्धा मोठ्या कष्टाने टेकडी चढून येत असताना त्यांना दिसली. तिच्या हातात दुधाने भरलेला एक लहानसा चांदीचा पेला होता.

हे दृश्य पाहून लोक हसू लागले. त्यांना वाटले दुधाचे शेकडो घडे ओतूनही ते दूध फक्त नाभीपर्यंतच पोहचू शकले, तेव्हा हे पेलाभर दूध सर्वांगस्नान कसे घडविणार ? काय उपयोग ह्या पेलाभर दुधाचा ?

चावुंडरायाने त्या वृद्धेला पाहिले. आज्ञा दिली, "ठीक आहे. हे दूधही मूर्तीवर ओता !"

मोठेच आश्चर्य ! ते पेलाभर दूध ओतताच त्या मूर्तीच्या डोक्यावरून एखाद्या झऱ्यासारखा दुधाचा प्रवाह वेगाने वाहू लागला. तो नाभीपर्यंत येऊन व तेथून वेगाने खाली येत पायापर्यंत

पोहचला. मूर्तीचे सर्वांग ओले झाले. लोक चकित झाले, हर्षित झाले, आनंदाने जयघोष करू लागले.

चतुर चावुंडरायाने ह्या घटनेचा अर्थ ओळखला. त्याला असे वाटत होते की आपण आपल्या प्रयत्नाने ही खोदीव मूर्ती तयार केली. आपल्या ह्या कर्तृत्वाचा त्याला अहंकार होता. त्याचे डोळे उघडले. अहंकार चूर्ण झाला. आता त्याला उमजले की, आपण केवळ एक साधन आहोत, निमित्त आहोत. बाहुबलीची–भगवंताची कृपा नसती तर ही मूर्ती घडविता आली नसती. केवळ पेलाभर दूधाने मूर्तीला सर्वांगस्नान घडले ही देवाचीच कृपा होय. त्याची इच्छा नसती तर ही मूर्ती घडविता आली नसती. मग सर्वांग-स्नान कुठले ? चावुंडराय हा केवळ निमित्त मात्र होता. सर्व कर्तृत्व बाहुबलीचे.

बाहुबलीला गोम्मटेश्वर किंवा गोम्मटस्वामी असेही म्हणतात. चावुंडरायाने हे नाव दिले. कदाचित चावुंडरायाचे दुसरे नाव 'गोम्मट' असे असावे. 'गोम्मटा'चा ईश्वर म्हणजे गोम्मटेश्वर.

त्यानेच ही मूर्ती तयार करविली म्हणून 'गोम्मटेश्वर' हे नाव मिळाले असावे.

बारा वर्षातून एकदा गोम्मटेश्वराच्या मूर्तीला 'महामस्तकाभिषेक' समारंभ होत असतो. संपूर्ण भारतातून असंख्य लोक हा समारंभ पाहण्यासाठी व गोम्मटेश्वराच्या दर्शनासाठी येतात.

मूर्तीची प्रतिष्ठापना होऊन हजार वर्षे झाली. आजही ही भव्य, उंच व कल्याणकारी मूर्ती एका उंच टेकडीच्या शिखरावर उभी आहे. तिच्या डोक्यावर नीलाकाशाचे छत्र आहे.

मानवाने आपला स्वार्थ, आपल्या वासना व अहंकार ह्यांचा त्याग केला तर माणूस किती उच्च व थोर होऊ शकतो, ह्याचे स्मरण ही भव्य मूर्ती आजही देत आहे.

BVBK-0401320
९३२० दि. ६।९।८



# भारत-भारती

बाल पुस्तक-माला

म

रुईकर पथ, नागपुर ४४०००२